# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि ग्रंथालय

**डॉ. रंजना बी व्यवहारे**
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स
310-ब, न्यु नंदनवन, नागपूर
Phone No. : 9011007726
Email.ID:- taywadev@gmail.com

Crossref DOI -

---

**सारांश :**

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनशील धोरण आहे. शिक्षण हे देशातील सर्वांसाठी मूलभूत अधिकार आहे. समाजाचा विकास करण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासाची उभारणी करण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. या धोरणामध्ये विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, बहुविषयक अभ्यास, संशोधन, डिजिटल तंत्रज्ञान, माहिती साक्षरता आणि आजीवन शिक्षण यांना विशंष महत्व देण्यात आले आहे. या सर्व उद्दिष्टासाठी ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. आधुनिक ग्रंथालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची जागा नसून ज्ञानसंपादन, संशोधन, डिजिटल माहिती सेवा आणि शैक्षणिक संसाधनाचे केंद्र बनली आहेत. या संशोधनपर लेखामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील ग्रंथालयाचे स्थान, त्याची भूमिका, माहिती साक्षरता, ग्रंथपालाची बदलली जबावदारी, अंमलबजावणीतील आव्हाने आणि भविष्यातील दिशा यांचा अभ्यास करण्यात आला आहे.*

**बीजशब्द :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय, उच्च शिक्षण

---

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशाच्या सामाजिक, सास्कृतीक आणि आर्थिक प्रगतीसाठी शिक्षण हा मूलभूत घटक आहे. शिक्षणाने व्यक्तिचा संपूर्ण विकास होण्यास मदत मिळते. शिक्षण गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्याला चालना मिळण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका खूप महत्वाची ठरते. नवीन शैक्षणिक धोरण हे पूर्णतः विद्यार्थीकेंद्रित असून त्यांना शिक्षण घेत असतांना तो कुठेही राहत असला तरीही त्याला चांगल्या प्रकारची गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था पुरविली पाहिजे असे अपेक्षित आहे. भारतातील मुलांना-युवकांना आपल्या देशाविषयी आणि इथल्या विविध साजाजिक, सांसकृतीक आणि तांत्रिक गरजाबरोबरच, कला भाषा आणि ज्ञानाच्या परंपराविषयी माहिती होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे शिक्षणव्यवस्था अधिक प्रगल्भ आणि समावेशक

तंत्रज्ञानावर आधारीत, संशोधनाला चालना देणारी आणि कौशल्यकेंद्रित करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थांचा सर्वांगीण विकासाबरोबरच माहितीचा प्रभावी वापर, डिजिटल शिक्षण, संशोधन आणि वाचन संस्कृती यांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका अधिक व्यापक आणि महत्वपूर्ण राहणार असल्याचे जाणवते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण् 2020 हे भारत सरकारने 29 जुलै 2020 रोजी जाहीर केले. मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी समान न्याय आणि समाज विकसीत करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनाचा पुरेपुर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे शिक्षण हा व्यक्तिच्या भविष्यासाठी सर्वांत चांगला मार्ग आहे. ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये वेगाने बदल होत आहेत. विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामधील वेगाने होत असलेल्या विकासामुळे जगभरातील अकुशल कामे आता माणसाऐवजी यंत्रे करतात आहे. याकरीताच समाजातील काही सामाजिक स्वरूपातील समसया दूर करण्याकरीता बहुशाखीय शिक्षणाची गरज निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. मुलांनी केवळ शिकणेच महत्त्वाचे ठरणार नाही तर कसे शिकायचे हे शिकणे जास्त महत्वाचे ठरणार आहे. त्यामुळे मजकूर कमी करून शिक्षण तार्किक विचार कसा करायचा आणि समस्या कशा सोडवायच्या बहुशाख्यीय कसे व्हायचे, नाविन्यपूर्ण कशी आणायची, नवनवीन आणि बदलणा-या क्षेत्रातील नवीन सामग्री कशाप्रकारे आत्मसात करायची याचा विचार करण्यास तयार झाले पाहिजे. शिक्षणामुळे चारि़त्र्य घडले पाहिजे आणि त्यायोगे शिकणारे नीतिवान, तर्कशुद्ध, सहानुभुतीशील, विद्यार्थी लाभदायी,समाधानकारक रोजगार मिळण्यासाठीही तयार होतील.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये देशातील सर्व विद्यार्थांना चांगल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था पूरविली गेली पाहिजे. समाजातील जे उपेक्षित, वंचित आणि अल्प प्रतिनिधित्व असलेल्या गटांवर विशेष लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. शिक्षण हे समानता सुनिचित करण्याचे मोठे माध्यम आहे. आणि याद्वारे समाजात समानता, सर्व समावेशकता आणि सामाजिक, आर्थिक गतिशीलता साध्य करता येते. विद्यार्थांना कोणत्याही प्रकारचे अडथडे आले तरी शिक्षण व्यवस्थेत प्रवेश घेण्यासाठी आणि त्यात त्यांना उत्कृष्ट कामगिरी करता येण्याकरीता सर्व प्रयत्न झाले पाहिजे. भारताच्या समृद्ध विविधतेचा आणि संस्कृतीचा मान ठेवत देशाच्या स्थानिक आणि वैश्विक गरजा लक्षात घेता या सर्व गोष्टीचा नविन शैक्षणिक धोरणात समावेश केला आहे.

**नविन शैक्षणिक धोरणाची तत्वे :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे देशाच्या समृद्ध, सांस्कृतीक वारशावर आधारीत भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या महत्वपूर्ण पुनर्रचनेची कल्पना केली आहे. भारतीय शिक्षणव्यवस्थेला अधिक गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि लवचिक व विद्यार्थी केंद्रित बनविण्यासाठी तयार करण्यात आले आहे. यामध्ये सर्वांसाठी उच्च दर्जाचे शिक्षण

आणि त्याद्वारे भारताला ज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता बनविणे, तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास घडविणे आणि कौशल्य विकसीत करणे यावर भर देण्यात आला आहे. जिथे सुरक्षित आणि प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण असते, तिथे सर्व विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विविध प्रकार उपलब्ध करून दिले जातात. जिथे शिकण्यासाठी चांगल्या पायाभूत संविधा आणि उपयोगी संसाधने उपलब्ध असतात ती खरी चांगली शिक्षण संस्था असते. या सर्व गोष्टी साध्य करणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. त्याचप्रमाणे संस्था आणि शिक्षणाच्या विविध टप्यामध्ये सुलभ समन्वय असणे आवश्यक आहे. काही **तत्वे** खालीलप्रमाणे सांगता येतील: -

**1. सर्वांगीन विकास :**

शिक्षण हे केवळ पाठयपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता त्याद्वारे विद्यार्थ्यंचा बौद्धिक, शारीरीक, भावनिक, सामाजिक, नैतिक आणि सर्जनशील विकास घडविण्यावर भर देण्यात आला आहे.

**2. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण** :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या आवड, गरजा त्यांची क्षमता आणि शिकण्याच्या गतीनुसार शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, त्यांचा स्वतत्रं विचार क्षमता आणि समस्या सोडविण्याची संधी दिली जाते.

**3. कौशल्याधारित शिक्षण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना पारंपारीक शिक्षणा बरोबरच व्यावसायिक शिक्षण, उद्योजकता, संवादकौशल्य, संगणक कौशल्य आणि जीवनोपयोगी कौशल्य विकसीत करण्यावर भर देण्यात आला आहे.

**4. तंत्रज्ञानावर भर :**

डिजिटल शिक्षण,ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निग, आभासी प्रयोगशाळा, डिजिटल ग्रंथालये आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे.

**5. सर्वसमावेशक आणि समान शिक्षण :**

सामाजिक, आर्थिक किंवा भौगोलिक परिस्थिती कोणतीही असो, प्रत्येक विद्यार्थ्यांला समान आणि दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी विशेष उपयोजना सूचविण्यात आल्या आहेत.

**6. संशोधनाला आणि नवोपक्रमाला चालना :**

उच्च शिक्षणात संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि

नविन उपक्रमाची क्षमता विकसीत करण्यावर अधिक भर देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येते.

**7. मातृभाषेतून शिक्षण :**

विद्यार्थांची आकलन क्षमता वाढविण्यासाठी शिक्षण मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषात देण्यात प्राधान्य दयावे.

**8. लवचिकता :**

शालेय आणि उच्च शिक्षणात विषय निवडण्याचे स्वातंत्र देणे जेणेकरून विद्यार्थी कला, विज्ञान आणि व्यावसायिक विषयाचे मिश्रण स्वताःच्या आवडीनुसार करू शकेल.

**9. आजीवन शिक्षणाला प्रोत्साहन :**

व्यक्तीने आयुष्यभर नवीन ज्ञान आणि कौशल्य आत्मसात करत राहावे यासाठी सतत शिक्षण आणि स्व अभ्यासाला प्रोत्साहन देण्यात आले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि ग्रंथालय :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये ग्रंथालयाला ज्ञानसंपदा केंद्र म्हणून विकसीत करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येकच शैक्षणिक संस्थेत आधुनिक, डिजिटल आणि सर्वसमावेशक ग्रंथालय असावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. ग्रंथालयामध्ये मुद्रित पुस्तकासह ई-पुस्तके, ई-जर्नल्स्,संशोधन डेटाबेस, डिजिटल संग्रह, मुक्त शैक्षणिक साधने आणि आनलाइन माहिती स्त्रोत उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, संशोधनाला चालना देण्यासाठी दर्जेदार संदर्भ साहित्य उपलब्ध करणे.लोकपरंपरा व भारतीय ज्ञानपरंपरेचे जतन करणे, स्थानिक भाषेला महत्व, तसेच माहिती साक्षरता विकसीत करणे ही महत्वाची कामे ग्रंथालयाला निभवावी लागणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ग्रंथालयाची महत्वाची भूमिका असून ती काही प्रमाणात खालील प्रमाणे सांगता येईल

**1. गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सहाय्य :**

ग्रंथालय हे अध्यापन-अध्ययन प्रक्रिचे महत्वाचे केंद्र आहे. शिक्षकांना क्रमिक पुस्तकाबरोबरच अद्यावत संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, नियतकालिके, वेगवेगळया प्रकारचे ई- संसाधने उपलब्ध करून देऊन अध्यापन आणि संशोधन अधिक परिणामकारक होण्यास मदत मिळू शकेल. तसेच विद्यार्थ्यांनाही अभ्यासासोबतच इतरही वाचनीय साहित्य उपलब्ध करून दिल्यामुळे त्याचे अभ्यासाबाहेरील ज्ञान विकसीत होऊन त्यांचा सर्वांगीन विकास होऊ शकेल.

**2. डिजिटल ग्रंथालयाची उभारणी :**

आधुनिक शिक्षण व्यवस्थेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्व लक्षात घेता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालयातील तंत्रज्ञान आणि डिजिटल ग्रंथालयाच्या विकासावर भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ग्रंथालयात पारंपारीक छापील पुस्तकाबरोबरच ई-पुस्तके, ई-जर्नल्स्, ओपन रिसोर्सेस, व्हिडिओ, व्याख्याने, डेटाबेसेस उपलब्ध करून देणे जेणे करून विद्यार्थी यांच्या माध्यमातून आपले अध्ययन, संशोधन पूर्ण करू शकेल.

**3. माहिती साक्षरता :**

आजच्या माहितीत्र्रा युगात दररोज नविन माहिती उदयाला येते. या नविन निघणा-या माहितीचा साठा बनत जातो. विद्यार्थांना या माहितीच्य साठयातून विश्वासपूर्ण आणि योगय माहिती निवडणे हे खूप मोठे कौशल्य आहे. तेव्हा ग्रंथालय विद्यार्थांना माहिती शोधने, तिचे मुल्यमापन करणे, योग्य संदर्भ देणे, त्या माहितीचा योग्य तो वापर करणे त्याचबरोबर डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करणे याबाबत प्रशिक्षण देणे म्हणजेच विद्यार्थांमध्ये माहिती साक्षर विकसीत करणे होय.

**4. कौशल्य विकास आणि रोजगारभिमुख शिक्षण :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात रोजगारभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे. त्यामुळेच ग्रंथालयात करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, मासिके, उेजकता, तंत्रज्ञान, डिजिटल कौशल्य, व्यवसाय व्यवस्थापन आणि रोजगार विषयक माहिती उपलब्ध करून विद्यार्थांच्या रोजगार क्षमतेत वाढ केली जाते.

**5. समुदाय विकास :**

ग्रंथालय हि सेवाभावी संस्था असून समाजाच्या विकासात ग्रंथालयाचे महत्वाचे स्थान आहे. ग्रंथालय हे समाजासाठी ज्ञानकेंद्र म्हणून कार्य करते. ग्रंथालयाद्वारे समाजभिमुख अनेक प्रकारचे शैक्षणिक आणि जनजागृतीपर कार्यक्रम राबवून समाजाला शिक्षित करू शकते. ग्रंथालयाद्वारे पौढ शिक्षण, डिजिटल साक्षरता, करिअर मार्गदर्शन, महिला सक्षमिकरण, आरोग्य विषयक इ. प्रकारचे कार्यक्रम राबविले जाऊ शकतात. यामुळे समाजातील लोकांना या शिक्षणाचा लाभ मिळून समुदाय विकास होण्यास मदत होऊ शकेल.

**राष्ट्रीय शैक्षणिक धेरणात ग्रंथपालाची बदलती भूमिका :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथपालाच्या भूमिकेत बदल झाल्याचे दिसून येते. आधुनिक काळातील ग्रंथपाल केवळ पुस्तकांचा राखणदार किंवा व्यवस्थापक नसून आता तो माहितीतंज्ञ झाल्याचे दिसून येते. आधुनिक ग्रंथालयात पारंपारीक ग्रंथासोबतच डिजिटल स्वरूपातील माहिती जशी ई-लर्निग,कृत्रिम बुद्धिमत्ता, नैसर्गिक भाषा प्रक्रिया यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन आणि विकास वाढविण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करावे लागते. ग्रंथायात येणा-या संशोधकांना त्यांच्या संशोधनाच्या बाबतीत

लागणारी बहुविद्याशाखाय संदर्भ सेवा, संशोधन पोर्टल, डेटा संकलन करण्यास येणा-या अडचणी दूर करून संशोधकांना त्यांच्या संशोधनात मदत करून ग्रंथपाल आपली भूमिका योग्यरित्या निभावत असल्याचे दिसून येते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धेरणातील ग्रंथालयासमोरील आव्हाने :**

1. डिजिटल पायाभत सूविधांचा अभाव
2. प्रशिक्षित कर्मचा-याची कमतरता
3. आर्थिक मर्यादा
4. इंटरनेट मर्यादा
5. माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षणाचा अभाव
6. अद्ययावत पुस्तकांची कमतरता

**ग्रंथालयातील सुधारणा करण्यासाठी उपाय :**

1. सर्वच शैक्षणिक संस्थामध्ये आधुनिक सुसज्ज ग्रंथालय तयार करणे
2. ग्रंथालयांना पुरेशा स्वरूपातील निधी उपलब्ध करून देणे
3. ग्रंथालय कर्मचा-यांना नेहमीच प्रशिक्षित करण्यात यावे
4. ग्रंथालयात तंत्रज्ञानाच्या योग्य त्या सोयी उपलब्ध करून देणे
5. ग्रंथालयात पाहिजे त्या स्वरूपात पुरेशी मनुष्यबळ उपलब्ध करून देणे

**निष्कर्ष :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे भंडार नसून शिक्षण व्यवस्थेचा महत्वाचा आधार आहे.विद्यार्थांमध्ये ज्ञाननिर्मिती, संशोधन, सर्जनशीलता, वाचन संस्कृती वाढविणे, त्यांचे व्यक्तिमत्व विकसीत करण्यात ग्रंथालयाची महत्वाची भमिका असते. आधुनिक ग्रंथालयात पारंपारीक ग्रंथालयासोबतच डिजिटल, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्वसमावेशक ग्रंथालय व्यवस्था असणे आवश्यक आहे. भविष्यातील उत्तम नागरीक, संशोधक आणि ज्ञानावर आधारीत भारत घडहवण्यात ग्रंथालयाची भूमिका अधिक स्वरूपात व्यापक होणार असून त्यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, ग्रंथपाल आणि समाज यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहे.

**संदर्भ :**


- लोहकरे, रोहिदास सदाषिव : राश्ट्रीय षैक्षणिक धोरण २०२० व महाविद्यालयीन ग्रंथपालाची भूमिका Journal of Research and Development
- सातपुते, श्रीलक्ष्मी मधुसुदन : राश्ट्रीय षैक्षणिक धोरण २०२० आणि ग्रंथालयाची भूमिका
- https://mr.wikipedia.org

- https ://vcmou.ac.in
- https ;//www.extramarks .com